

# कंदील

खेड्यापाड्यात उजेडाकरता कंदील, मेणबत्ती, चिमणी, समई यांचा उपयोग करतात. समई, मेणबत्ती किंवा चिमणी ह्यांच्यापेक्षा कंदील वापरणे जास्त सोयीचे असते.

© होमी भाभा विज्ञान शिक्षण केन्द्र, मुंबई ४००००५.
प्रकाशक: इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ एज्युकेशन,
(विद्याभारती) पुणे ४११०२९.



मेणबत्तीत मेण जळते.
समईत व पणतीत गोडेतेल जळते.
चिमणी व कंदिलात रॉकेल जळते.
गोडेतेल, मेण ह्यांच्यापेक्षा
रॉकेल स्वस्त असते.
त्यामुळे कंदील वापरणे परवडते.

समई किंवा मेणबत्तीपेक्षा कंदील जास्त सुरक्षित असतो. खेड्यातील बरीच घरे कुडाची किंवा लाकडी फळ्या वापरून केलेली असतात. घरात जागा कमी असते. लहानशा जागेत धान्य, गवत, सरपण वगैरे वस्तू ठेवलेल्या असतात.



समईची किंवा मेणबत्तीची वात उघडी असल्यामुळे आग लागण्याचा धोका असतो. कंदिलाची वात काचेच्या आत असल्यामुळे आग लागण्याचा फारसा धोका नसतो.

सोसाट्याचा वारा सुटला आहे, सगळीकडे काळोख आहे
आणि आपल्याला बाहेर जायचे आहे. अशावेळी
कंदिलाचा फार उपयोग होतो. कंदिलाला काच असल्यामुळे
वाऱ्यातसुद्धा कंदील विझत नाही. पावसातही
कंदील नेता येतो. कंदिलाला कडी असते.
कडी धरून कंदील उचलणे फारच सोपे.

